लोकमत



# गरजूंसाठी पुढे आली युवा टीम

## मुकुल माधव फाउंडेशन, जागृती ग्रुपचा उपक्रम

**सहकारनगर :** लॉकडाऊनमुळे अडचणीत आलेल्या मजुरांवर उपासमारीची वेळ आली आहे. जागृती ग्रुप व मुकुल माधव फाउंडेशनच्या रितू छाब्रिया यांच्या सहकार्याने एका कुटुंबाला १५ दिवस पुरेल एवढे अन्न-धान्य आणि किराणा अशा गरजू लोकांना मोफत दिला जात आहे. आतापर्यंत पुणे परिसरातील दीड हजार कुटुंबांना मदत करण्यात आली आहे.

झोपडपट्यात राहणारे आणि रोजंदारीवर कामे करणारे, परप्रांतीय मजूर, ट्रॅफिक सिग्नलवर विक्री करणारे तसेच गरजू कुटुंबांना किराणा माल आणि इतर जीवनावश्यक सामग्री देण्यात आली.

अनेक भागातील गरजू मजुरांना हे किराणा किट दिले जात आहे. आतापर्यंत महानगरपालिका परिसर, घोरपडी, हडपसर गाडीतळ, शिवाजीनगर, बाणेर, येरवडा, विश्रांतवाडी आणि कात्रज परिसरात मदतीचे वाटप करण्यात आले.

जास्तीत जास्त लोकांपर्यंत मदत पोहोचावी, म्हणून राज देशमुख, पराग मते, मनीषा वाघमारे, अक्षय भागवत, सुवर्णा तापकीर, रवींद्र भोसले, दिलीप शेलवंटे, मानसी पवार, विशाल हिरेमठ, विवेक सूर्यवंशी आदी यासाठी परिश्रम घेत आहेत.